# दि जालना पिपल्स् को-ऑप. बँक लि., जालना

मुख्य कार्यालय: कवी रामकृष्ण शोला चौक, सदर बाझार, जालना – ४३१२०३

---

**नोकरभरती जाहिरात कोड क्र. १०७/२०२३-२४**

दि जालना पिपल्स् को-ऑप. बँक लि., जालना यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेल्या **Trainee Sr. Officer (Branch Officer)** व **Trainee Clerk** रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेद्वारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ http://www.mucbf.in/ आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी | दि. १७/०८/२०२३ सकाळी ११.०० पासून ते दि. २६/०८/२०२३ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| २ | परीक्षा शुल्क ऑफलाईन पद्धतीने भरण्याचा व संकेतस्थळावर अद्ययावत करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २६/०८/२०२३ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| ३ | परीक्षा दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ४ | परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ५ | मुलाखत दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

## महत्वाच्या सूचना

१) उमेद्वाराकडे वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असावा, जो निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध आणि सक्रिय राहिला पाहिजे. तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेद्वारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेद्वाराची राहिल. तसेच ई-मेल आय.डी. व संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना फेडरेशन व बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान फेडरेशनच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरतीप्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहिल.

२) उमेद्वारांनी अर्ज भरताना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. उमेद्वारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रके, अन्य प्रमाणपत्रके व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेद्वाराने त्याचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी

जबाबदारी संबंधित उमेद्वाराची राहील व याबाबत उमेद्वारास कोठेही व कोणत्याही प्रकारे तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यावर बदलता येणार नाही.

३) सदर भरती प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळावर असलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन व पालन करुन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहील.

४) इच्छुक उमेदवारांनी अर्जातील माहिती पूर्ण भरुन वैध ई-मेल अॅड्रेससह दि. १७/०८/२०२३ पासून १० दिवसांत सदर अर्जाची ऑनलाईन पद्धतीने दि. २६/०८/२०२३ पर्यंत रात्री ११:५९ वाजेपर्यंत नोंदणी करावी. त्यानंतर आलेल्या अथवा अर्जासोबत परीक्षा शुल्क न भरणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. Trainee Sr. Officer (Branch Officer) पदांची लेखी (लघु व दिर्घ स्वरुपाची) परीक्षा व Trainee Clerk पदांची बहुपर्यायी प्रश्नांची ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येईल.

५) उमेद्वाराची परीक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रकांची पूर्व तपासणी/छाननी न करता घेण्यात येणार असल्याने या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेद्वारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रकांच्या पूर्ण छाननी व तपासणीनंतरच त्यांची वैधता पाहून उमेद्वाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत उमेद्वार कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेद्वारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार फेडरेशनने व बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेद्वारांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.

६) उमेद्वारांना ऑफलाईन परीक्षा/कागदपत्रके पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

७) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेद्वारांची मुलाखतीद्वारे निवड केली जाईल.

८) अपात्र उमेद्वारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत दिले जाणार नाही.

९) परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इ. बाबतची माहिती पात्र उमेद्वारांना संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

१०) मुलाखतीच्या कॉल लेटर्सबाबत उमेद्वारांना फेडरेशनच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

११) उमेद्वाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असावा. सदर माहिती अथवा तपशील चूकीचा अथवा खोटा आढळल्यास सदर उमेद्वाराचा अर्ज नोकरभरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१२) भरती प्रक्रियेत/निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार फेडरेशनला व बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेद्वारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

१३) सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या बँकेच्या आवश्यकतेनुसार कमी/जास्त होऊ शकते. नोकरभरतीविषयक सर्वाधिकार फेडरेशन व बँक राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशत: भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकारदेखील फेडरेशन व बँक राखून ठेवत आहे.

❖ **पदाचे नाव: Trainee Sr. Officer (Branch Officer)**

**एकूण पदे:** ०४

**शैक्षणिक अर्हता:**

मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी (किमान ५०% आवश्यक) (प्रथम प्रयत्नांत उत्तीर्ण) व MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक

**वयामर्यादा:** दि. ०१.०८.२०२३ रोजी किमान ३० वर्षे ते कमाल ४० वर्षे

**नोकरी ठिकाण:** बँकेचे कार्यक्षेत्र (जालना, औरंगाबाद व परभणी जिल्हा)

**प्राधान्य:**

- ❖ JAIIB / CAIIB / LLB / M.Com. / MBA (Finance / Accounts / Law) / Diploma in Banking & Finance / Diploma in Co-operative Management / DCBM / GDC&A उत्तीर्ण
- ❖ महाराष्ट्र राज्यातील जालना जिल्ह्यात राहत असलेल्या उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

**भाषेचे ज्ञान:**

मराठी/इंग्रजी/हिंदी भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व असावे.

**अनुभव:**

नागरी सहकारी बँकेतील/पतसंस्थेतील अधिकारी पदाचा पाच वर्षाचा अनुभव, तसेच कर्ज व वसुली विभागामधील अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.

**निवड कार्यपद्धती:**

१. **ऑफलाईन परीक्षा :**

Trainee Sr. Officer (Branch Officer) पदांकरिता १०० गुणांची लेखी (लघु व दिर्घ स्वरुपाची) परीक्षा ऑफलाईन पद्धतीने इंग्रजी माध्यमातून घेण्यात येईल. परीक्षेचा नमुना संकेतस्थळावर (http://www.mucbf.in/) प्रसिद्ध करण्यात येईल. तद्नंतर १०० पैकी प्राप्त गुणांचे ९० च्या गुणोत्तरामध्ये रुपांतर करण्यात येईल.

२. **कागदपत्रके पडताळणी:**

उमेद्वारास ऑफलाईन परीक्षेतील गुणांच्या उतरत्या क्रमवारीनुसार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रके पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्यावेळी उमेद्वाराने मूळ कागदपत्रके उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रके पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेद्वारास बँक धोरणाप्रमाणे बँकेकडून मुलाखतीस बोलविण्यात येईल.

३. **मुलाखत:**

Trainee Sr. Officer (Branch Officer) पदांकरिता उत्तीर्ण होणाऱ्या उमेद्वारांना बँकेच्या धोरणानुसार भरावयाचे पदसंख्येच्या प्रमाणात ऑफलाईन परीक्षेचे गुणानुक्रमे मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखतीकरिता १० गुण (शैक्षणिक पात्रतेकरिता ५ गुण व मौखिक मुलाखतीकरिता ५ गुण) राहतील. उमेद्वार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस (परीक्षेत उत्तीर्ण झालेला असला तरी) पात्र राहणार नाही.

४. **उमेद्वाराची अंतिम निवड सूची:**

उमेद्वाराचे ऑफलाईन परीक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

❖ **पदाचे नाव: Trainee Clerk**

**एकूण पदे:** १५

**शैक्षणिक अर्हता:**

मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी (किमान ५०% आवश्यक) (प्रथम प्रयत्नांत उत्तीर्ण) व MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक

**वयामर्यादा:** दि. ०१.०८.२०२३ रोजी किमान २२ ते कमाल ३५ वर्षे

**नोकरी ठिकाण:** बँकेचे कार्यक्षेत्र (जालना, औरंगाबाद व परभणी जिल्हा)

**प्राधान्य:**

- ❖ B.Com./M.Com./MBA (Finance)/GDC&A उत्तीर्ण
- ❖ महाराष्ट्र राज्यातील जालना जिल्ह्यात राहत असलेल्या उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

**भाषेचे ज्ञान:**

मराठी/इंग्रजी/हिंदी भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व असावे.

**अनुभव:**

कोणत्याही सहकारी बँकिंग क्षेत्रात किंवा इतर वित्तीय संस्थेत एक वर्षाचा लिपिक पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

**निवड कार्यपद्धती:**

१. **ऑफलाईन परीक्षा :**
Trainee Clerk पदांकरिता १०० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा ऑफलाईन पद्धतीने इंग्रजी माध्यमातून घेण्यात येईल. बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांमध्ये गणित, इंग्रजी व्याकरण, संगणक आणि सहकार ज्ञान, बौधिक चाचणी, सामान्य ज्ञान आणि आर्थिक ज्ञान या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल. तद्नंतर १०० पैकी प्राप्त गुणांचे ९० च्या गुणोत्तरामध्ये रुपांतर करण्यात येईल.

२. **कागदपत्रके पडताळणी:**
उमेद्वारास ऑफलाईन परीक्षेतील गुणांच्या उतरत्या क्रमवारीनुसार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रके पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्यावेळी उमेद्वाराने मूळ कागदपत्रके उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रके पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेद्वारास बँक धोरणाप्रमाणे बँकेकडून मुलाखतीस बोलविण्यात येईल.

३. **मुलाखत:**
Trainee Clerk पदांकरिता उत्तीर्ण होणाऱ्या उमेद्वारांना बँकेच्या धोरणानुसार भरावयाचे पदसंख्येच्या प्रमाणात ऑफलाईन परीक्षेचे गुणानुक्रमे मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखतीकरिता १० गुण (शैक्षणिक पात्रतेकरिता ५ गुण व मौखिक मुलाखतीकरिता ५ गुण) राहतील. उमेद्वार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस (परीक्षेत उत्तीर्ण झालेला असला तरी) पात्र राहणार नाही.

४. **उमेद्वाराची अंतिम निवड सूची:**
उमेद्वाराचे ऑफलाईन परीक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

❖ **परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे स्वीकारले जाईल:**

परीक्षा शुल्क रु. ८००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण रु. ९४४/-

**बँक खात्याचा तपशील:**

**Bank Account Name: The Maharashtra Urban Cooperative Banks Federation Ltd.**
**Bank Name: UCO Bank, Wadala Branch, Mumbai – 400031.**
**Saving A/c No.:09780110032961,**
**IFSC code :UCBA0000978**

**परीक्षा शुल्काबाबत सुचना:**

परीक्षा शुल्काची रक्कम ही वर नमुद केल्याप्रमाणे उमेद्वारांनी बँकेमध्ये **NEFT/RTGS/UPI** द्वारे भरुन बँकेकडून परीक्षा शुल्क भरल्याची माहिती **(Transaction ID/UTR No.)** ऑनलाईन अर्ज भरताना नमुद करावी. तसे न केल्यास किंवा चुकीची माहिती भरल्यास उमेद्वाराची उमेद्वारी रद्द करण्यात येईल.

उमेद्वारांना अर्ज भरतांना अडचणी/शंका असल्यास संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करुन अडचणी/शंकांचे निरसन करावे.

*****